**सन २०१५-१६ करीता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत मंजूर Watershed Development या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः केंद्रिय-२०१७/प्र.क्र.१००/का.१९**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: ३०/०१/२०१८

वाचा-

१) आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.केंद्रीय २०१५ /प्र.क्र.६२/का-१९ दि.३०/०१/२०१६
२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१७/प्र.क्र.८१/का-१९ दि.१७/११/२०१७
३) वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण ठाणे क्र.कार्यालयाचे पत्र क्र. अ/कक्ष-१/ योजना/ २९४/ २०१७-१८ दि.१८/११/२०१७

प्रस्तावना -

केंद्र शासनाने त्यांच्या भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत अनुदान या योजनेखाली सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात ११ योजनांकरीता एकुण १२८७४.०० लक्ष निधी वितरीत केला आहे.सदरचा निधी आयुक्त, आदिवासी विकास यांना वाचा येथिल क्रमांक १ अन्वये वितरीत केला आहे.या वितरीत निधीतून पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या योजनासाठी रुपये १५००.०० इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. या निधीपैकी वाचा क्र. २ येथील शासन निर्णयान्वये रु.९९८.४६ लक्ष इतका निधी वितरित केला आहे. जव्हार व मोखाडा तालूक्यातील पाणलोट क्षेत्र विकास अंतर्गत मृद व जलसंधारणाच्या कामासाठी उपलब्ध करून देण्यात आला असून वनसंरक्षक सामाजिक वनीकरण ठाणे यांनी पाणलोट क्षेत्र विकास अंतर्गत मृद व जलसंधारण (अनघट दगडी बांध) व मृद संधारणासाठी वनरोपन (तुटक समतल चर खोदणे व बी पेरणे) कामास अनुदान राज्यस्तरावर मिळण्याबाबत वाचा क्र. ३ द्वारे विनंती केली आहे. सदर प्रस्तावाकरीता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत अनुदान या योजनेतून सन २०१५-१६ करीता Watershed Development करीता मंजूर निधीतून जव्हार व मोखाडा तालुक्यात पाणलोट क्षेत्र विकास अंतर्गत मृद व जंलसधारणाच्या कामांना मंजुरी देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय-**

या निर्णयाद्वारे सन २०१५-१६ करीता Watershed Development करीता मंजूर निधीतून जव्हार व मोखाडा तालुक्यात पाणलोट क्षेत्र विकास अंतर्गत वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, ठाणे यांच्या वाचा येथील क्र.३ च्या प्रस्तावास मृद व जंलसधारणाच्या एकूण ५६ कामांना रु. ४९६.६५ लक्ष इतक्या रकमेस पुढील कोष्टकानुसार मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

| प्रस्तावित कामे संख्या | अकुशल (मजुरी) रक्कम | साहीत्य सामग्री/ आकस्मिक खर्च | अंदाजपत्रकिय रक्कम |
|---|---|---|---|
| ५६ | ४,८१,७५,३९६/- | १४,८९,९६०/- | ४,९६,६५,३५८/- |

२. उपरोक्त कामांकरीता आयुक्त, आदिवासी विकास यांनी वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण ठाणे यांना मंजूर तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी. सदरची कामे शास्त्रोक्त पद्धतीने करून घेण्यासाठी पाणलोट विकासासाठी तयार केलेल्या

आराखड्याप्रमाणे करण्यात यावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी .

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०२१२२५२५६१२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ajitsingh R Rajput

Digitally signed by Ajitsingh R Rajput
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TDD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a614ce75be611413980d3efebe7cde81ad571ab119e8360b7b526b5159edd099, serialNumber=32168d31c7d800af039db3657f6a01d233033f3f7c16b7ca135b2c868025eb3e, cn=Ajitsingh R Rajput
Date: 2018.02.02 12:29:33 +05'30'

**(अ.रा.राजपूत)**
कार्यासन अधिकारी

**प्रत,**

१. मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२. मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
४. प्रधान सचिव,आदिवासी विकास,मंत्रालय,मुंबई
५. सचिव , जलसंधारण विभाग/वन विभाग, मंत्रालय,मुंबई
६. आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक
७. सहसचिव/उपसचिव,आदिवासी विकास,मंत्रालय,मुंबई
८. संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
९. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.